जिल्हा माहिती कार्यालय, अहमदनगर

दूरध्वनी ०२४१-२४११२१२ Email dionagar12@gmail.com Fax ०२४१- २४२७३७३

वृत्तपत्राचे नांव - सकाळ दिनांक 13 / 2 / २०१४

# मतदार नोंदणीसाठी आवाहन

नगर, ता. १२ : जिल्ह्यातील मतदारयाद्या अद्ययावत करताना ज्यांची नावे नजरचुकीने वगळली आहेत किंवा १८ वर्षे पूर्ण झालेल्यांनी छायाचित्र मतदारनोंदणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी रुबल अग्रवाल यांनी केले.

जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांच्या याद्या अद्ययावत करण्यात आल्या आहेत. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत घरोघरी तपासणी केली असता, काही मतदार मृत, स्थलांतरित, दुबार, बेपत्ता आढळून आले. अशा मतदारांना वगळण्यात आले आहे. मृत मतदारांची नावे वगळताना बीएलओचा अहवाल, स्थानिक स्वराज्य संस्थेचा मृत्यू दाखला किंवा नातेवाइकांकडून भरण्यात आलेल्या अर्ज क्रमांक सात, याद्वारे कार्यवाही करण्यात आली.

अंतिम मतदारयाद्या संबंधित सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसील कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. तसेच सर्व तहसील कार्यालयांत मतदार मदत केंद्र स्थापन करण्यात आले आहे. ज्या मतदारांची नावे चुकीने वगळली गेली किंवा १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांनी संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे अर्ज भरून द्यावा, तसेच जिल्ह्यात कार्यरत सर्व शासकीय, निमशासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्यांच्या सर्वसाधारण रहिवासाच्या ठिकाणी नावनोंदणी करावी, असे अग्रवाल यांनी सांगितले.